# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 99 /2020 दिनांक: 25 / 03 /2020

## कोव्हीड- १९

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा -2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 14 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. सह. जिल्हा निंबंधक वर्ग-1 अकोला यांचे पत्र दिनांक 23.3.2020
6. महाराष्ट्र पोलीस अधिनियम -1951
7. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष 2प्रस/गृह/कावि-98/2020 दि. 23.3.2020
8. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मुंबई यांची अधिसूचना क्र. No.DMU/2020CR ९२DisM-१ दि. 24 मार्च 2020
9. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे आदेश क्र. 403/2020D दिनांक 24.3.2020

## आदेश

**ज्याअर्थी**, संदर्भीय आदेश क्र. 7 नुसार संपूर्ण अकोला जिल्हयात संचारबदी लावण्यात आलेली आहे. व अकोला जिल्हयातील अत्यावश्यक व जिवनावश्यक सेवा वगळता सर्व सेवा बंद करण्यात आलेल्या आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, संदर्भ क्र.09 अन्वये अन्वये दिनांक 24 मार्च 2020 पासून पुढील 21 दिवस संपुर्ण भारतात संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये कोव्हीड-19 या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी हया कार्यालयाचे आदेशान्वये तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ह्यांना तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष नियुक्त केलेले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांना त्यांचे विभागाकरिता नियंत्रण अधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, संचारबंदीचे कालावधीमध्ये अत्यावश्यक सेवा अखंडीतपणे सुरळीत सुरु ठेवण्याची जवाबदारी तालुका स्तरावर तहसिलदार व उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकारी यांची आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अत्यावश्यक सेवा सुरळीतपणे सुरु ठेवण्यासाठी संचारबंदीचे काळात आवश्यक सेवेच्या पुरवठयासाठी त्या सेवांच्या साहीत्याची, अत्यावश्यक वाहतूक सुरु ठेवणे आवश्यक आहे अशी माझी व्यक्तीशः खात्री झाली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, गृह मंत्रालय भारत सरकार हयांचे दिनांक 24..3.2020 चे आदेशामध्ये असे नमूद आहे की, संचारबंदीचे काळात क्षेत्रीय स्तरावर जिल्हाधिकारी हे कार्यकारी दंडाधिकारी हयांच्या नियुक्त्या Incident Commander म्हणून करु शकतात व हे Incident Commander त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्वबाबींसाठी जबाबदार राहतील व इतर सर्व यंत्रणा हया Incident Commander हयांच्या आदेशानुसार काम पाहतील.

त्या अर्थी, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला , आपत्ती व्यवस्थापन कायदा**- 2005 , **साथरोग अधिनियम** 1897 **मधील खंड** 2,3 **व** 4 व महाराष्ट्र शासनाची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020 ची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी अकोला जिल्हयातील सर्व तहसलिदार तथा तालुका

NitinN 103

दंडाधिकारी हयांना त्यांचे संपुर्ण तालुक्यासाठी **Incident Commander** व उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी हयांना त्यांचे उपविभागासाठी **Incident Commander** म्हणून घोषीत करित आहे.

उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये फौजदारी प्रक्रिया संहीता 1973 चे कलम 144 ची प्रभावी अंमलबजावणी होते किंवा नाही हे तपासावे व ती अंमलबजावणी पोलीस विभागाचे व इतर कार्यकारी यंत्रणेच्या मदतीने करुन घ्यावी. हयासाठी आपणास अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. तसेच संचारबंदीचे काळात अत्यावश्यक सेवा (वेळोवेळी दिलेल्या आदेशान्वये ठेवण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवा) हया सुरळीत सुरु राहतील, आरोग्य यंत्रणेला त्यांचे कार्य पार पाडतांना अडचण येणार नाही हंयाची दक्षता त्यांनी घ्यावी व त्याचे नियंत्रण करावे.

अत्यावश्यक सेवा पुरविणारे सेवा पुरवठादार यांनी त्यांचे वाहतूकीसाठी वापरले जाणारे व त्यांचे कर्मचारी यांचे वाहनांना अत्यावश्यक सेवेचे स्टीकर्स लावणे अनिवार्य आहे. स्टीकर्स लावलेली वाहने तपासून व खात्री करुन ती अत्यावश्यक सेवेसाठीच वापरण्यात येत आहे या बाबतची शहनिशा करुन पोलीस त्यांना कलम 144 मधून सूट देवू शकतात. परंतू विनाकारण कुठेही गर्दी होणारनाही व अनावश्यक वाहनेव व्यक्ती घराबाहेर पडणार नाही हयाची पोलीस यंत्रणेने दक्षता घ्यावी. तसेच अत्यावश्यक सेवा सुरु असतांना कोठेही गर्दी होणार नाही. लोक एकत्र येवून संचारबंदीचे नियम मोडणार नाही हयांची खबरदारी **Incident Commander** हयांनी घ्यावी. दैनिक कार्यवाहीचा, परिस्थितीचा अहवाल जिल्हास्तरावर पाठविणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणा-यावर **आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4, फौजदारी प्रक्रियासंहिता — 1973 चे कलम 144, भारतीय दंड संहिता, 1860 कलम 188 व इतर संबंधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कारवाई करण्यात येईल.**

सदर आदेश आज **दिनांक २५ मार्च २०१९** रोजी माझी स्वाक्षरी व शिक्कयानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

प्रतिलिपी —

1. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांनी माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
2. **आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला /जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
3. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी / तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी** ---------- सर्व. यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
4. **अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क, अकोला**
5. **मुख्याधिकारी** ---------------------------------------- मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,**
6. गट विकस अधिकारी------------------------- सर्व.
7. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला